चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
१२ जुन, २०१९
☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# पोलीस अधीक्षक कार्यालय येथे स्कुल बस सुरक्षाबाबत बैठक संपन्न

जिल्हयातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांची ने–आन करातांना सुरक्षीत व्हावी याकरीता महाराष्ट्र मोटार वाहन (स्कुलबस करिता विनियम) नियम–२०११ च्या शासन निर्णयानुसार जिल्हा पोलीस अधीक्षक हे जिल्हा स्कुलबस सुरक्षा समितीचे अध्यक्ष असतात. जिल्ह्यात स्कुलबसने विद्यार्थ्यांची ने–आन करतांना विद्यार्थ्यांना धोका होवु नये तसेच कोणत्याही प्रकारचा अपघात होवु नये याकरीता दि. १२/०६/२०१९ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालयात पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी, यांचे मार्गदर्शनात शहरातील सर्व शाळांच्या मुख्याध्यापक/प्राचार्य यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते.

मा. पोलीस अधीक्षक डॉ. महेश्वर रेड्डी यांनी महाराष्ट्र शासनाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन करावे याबाबत सक्त सुचना दिल्या. **प्रत्येक शाळास्तरावर शाळेतील मुलांची सुरक्षितपणे ने–आण करणे, परिवहन शुल्क, बस थांबे निश्चित करणे या बाबींकडे लक्ष देण्यासाठी प्रत्येक शाळेची एक परिवहन समिती स्थापण करण्याबात सर्व शाळांना सुचना दिल्या.** जिल्हा शिक्षणाधिकारी यांनी चंद्रपूर जिल्ह्यात २०१८–१९ या शैक्षणीक वर्षात २५०५ इतक्या शाळा असुन २४५२ शाळांमध्ये परिवहन समिती नेमल्याचे सांगीतले. ही समिती वाहनांची कागदपत्रे जसे नोंदणी प्रमाणपत्र, योग्यता प्रमाणपत्र, विमा प्रमाणपत्र, परवाना, वायु प्रदुषण नियंत्रण प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचे लायसन, अग्नीशामक, प्रथमोपचार पेटी ईत्यादींची पडताळणी करील. या समितीच्या अध्यक्षानी त्या शाळेचा प्राचार्य असेल एक पालक–शिक्षक संघाचा प्रतिनिधी, संबंधित क्षेत्राचा वाहतुक निरीक्षक किंवा पोलीस निरीक्षक, त्या क्षेत्राचा मोटार वाहन निरीक्षक किंवा सहायक मोटार वाहन निरीक्षक, शिक्षण निरीक्षक, बसच्या कंत्राटदाराचा प्रतिनिधी आणि स्थानिक प्राधिकरणाचा प्रतिनिधी यांचा समितीत समावेश असेल. समितीची तीन महिन्यातून किमान एकदा प्रत्येक सत्र सुरु होण्याच्या पुर्वी बैठक घेण्यांत येईल. विद्यार्थ्यांच्या सुरक्षीत प्रवासाकरीता शाळेचे प्राचार्य/मुख्याध्यापक जवाबदार राहतील अशी सुचनाही पोलीस अधीक्षक यांनी दिली. तसेच उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर श्री विश्वांभर शिंदे, यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलतांना, ज्या शाळेमध्ये

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

विद्यार्थ्यांची ने–आन स्कुल बसने होते त्यांनी आपल्या स्कुलबस निरीक्षणाकरीता उप प्रादेशिक कार्यालयात आणाव्यात अशा सुचना दिल्या.

स्कुलबस मधील प्रथमपोचार पेटी व योग्य औषधे बसमध्ये आहेत, हे प्राचार्यांनी दर महिन्याला चेक करण्याबाबतही मा. पालीस अधीक्षक यांनी सांगीतले. तसेच वाहनासोबत ने–आण करणाऱ्या शाळेतील मुलांची संपूर्ण यादी असेल ज्यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याचे नांव, वर्ग, निवासाचा पत्ता, संपर्क दुरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक, रक्तगट आणि त्याच्या किंवा तिच्या नावासमोर त्याला किंवा तिला चढण्याकरीता व उतरण्याकरीता थांबण्याचे ठिकाण त्याच्या किंवा तिच्या घराजवळील या गोष्टी नमुद केलेल्या असतील. यादीमध्ये मुळ ठिकाण, समाप्तीचे ठिकाण आणि वापरण्यात येणारा तपशिलवार मार्ग दाखवणारा शैक्षणिक संस्थेच्या मुख्य व्यक्तीकडून यथोचितरित्या साक्षांकित केलेला मार्गदेखील नमुद केलेला असेल तसेच शिशुवर्गातील मुलांच्या बाबतीत जर अधिकृत व्यक्ती (शाळा आणि पालक यांनी परस्पर सहमतीने मान्यता दिलेली व्यक्ती) बस स्टॉपवर मुलाला घ्यायला आली नाही तर, त्या मुलाला पुन्हा शाळेत पाठविण्यात येईल आणि त्याच्या पालकांना बोलावून ते मुल त्यांना घेऊन जाण्यास सांगण्यात येईल अशा सुचना दिल्या.

सर्व शाळांनी विद्यार्थी शाळेच्या गेटच्या आत शाळेत सोडावे व गेटच्या आतमधुनच बसमध्ये घ्यावे. कोणतीही शाळा मुलांना गेटच्या बाहेर बसमध्ये बसल्या व्यतिरिक्त किंवा पालकांच्या शिवाय बाहेर जावु देणार नाही. शाळेला एक आत जाण्यासाठी व एक बाहेर जाण्यासाठी असे दोन गेट ठेवावे. सर्व वाहने मुलांना सोडण्याकरीता व घेवुन जाण्याकरीता शाळेत शाळेच्या गेटमध्ये प्रवेश करुन ने–आन करतील. विद्यार्थी कॅनव्हास हुड असलेल्या वाहनाचा कुणीही विद्यार्थी सोडण्यासाठी वापर करणार नाही असे सक्त निर्देश पोलीस अधीक्षक यांनी दिले. अवैधपणे विद्यार्थ्यांची ने–आन करणाऱ्या वाहनांवर उप प्रादेशिक परिवहन अधिकारी व पोलीस निरीक्षक, वाहतुक शाखा, यांनी संयुक्त कार्यवाही करण्याबाबत पोलीस अधीक्षक यांनी सांगीतले.

सुचनांचे काटेकोरपण पालन न करणाऱ्या शाळांवर कायदेशिर कार्यवाही करण्याचेही मा. पोलीस अधिक्षक यांनी सांगीतले. तसेच समोर दिलेल्या सुचंनाचे सुध्दा काटेकोरपणे पालन कराण्याचे सुध्दा आवाहन केले आहे.

१.मुलांना ऑटोने पाठविणे हे अत्यंत धोक्याचे व बेकायदेशिर आहे.
२.स्कुलबसमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी बसता कामा नये.
३.स्कुलबस चालकाला पाच वर्ष हेवी वाहन चालविण्याचा अनुभव असावा.

४.स्कुलबसमध्ये चालका व्यतिरीक्त विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी एक सहवर्ती असने आवश्यक आहे.
५.स्कुलबसला स्पीड गव्हर्न असने गरजेचे आहे.
६.स्कुलबसने विद्यार्थी घरी पाहचेपर्यंतची जवाबदारी ही शाळा प्रशासनाची असते.

सदर सभेला मा. पोलीस अधीक्षक चंद्रपुर श्री. महेश्वर रेड्डी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा स्कुलबस सुरक्षीतता समितीचे सदस्य सचिव श्री विशांभर शिंदे, जिल्हा शिक्षणाधिकारी श्री संजय डोर्लीकर, जिल्हा वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक श्री एस.एस. भगत, श्री दिपक खेब्रागडे, पोलीस निरीक्षक, दुर्गापूर, श्री प्रकाश हाके, पोलीस निरीक्षक रामनगर, श्री बि.एम. गायबोले, पोस्टे पडोली व शहरातील २८ शाळांचे प्रतिनिधी या सभेला हाजर झाले होते.

———————————————————————————————